29-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/28/2025 9:55 PM Page 1



# साखळी महाविद्यालयात युफोरिया २०२५ उत्साहात

## इंग्रजी विभागातर्फे आयोजन | विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड



**साखळी, दि. २८** : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील इंग्रजी विभागातर्फे युफोरिया २०२५ उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या साहित्यिक, कलात्मक, बौद्धिक, पाककला आणि भाषिक कौशल्यांना आकर्षित करणाऱ्या १४ उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व्हॉट इज अ गुड वर्ड? या स्पर्धेत श्रावणी कुंभार आणि देवकी लवंदे, रोहिणी कमलाकर आणि अर्चना नायर, निधी सुर्लाकर आणि सलोनी घाडी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. तर प्रेमपत्र लेखन स्पर्धेत गॉर्डन पीरेस, अरिबा शाह आणि अमिरा शेख यांनी अनुक्रमे प्रथम. द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला. वक्तृत्व स्पर्धेत निक्षय होबळे, जेसन गोन्साल्वीस आणि अमिरा शेख यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविले. स्पेन अ टेल ऑफ रोमान्स स्पर्धेत जोशुआ जॉय आणि ऐश्वर्या मातोणकर यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकाविले. युफोरिया मडल्सच्या प्राथमिक फेरीचे आयोजन करण्यात आलेले होते. या फेरीत देव विटुरकर आणि गंगेश सावंत विजयी झाले. तर दीक्षांत सावंत, जेसन गोन्साल्वीस आणि साईशा कवठणकर व साक्षता सावंत यांना दुसरा क्रमांक मिळाला. काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.

यामध्ये गॉर्डन पीरेस, राहेल कुतिन्हो, अन्विका वायंगणकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर चित्रकला स्पर्धेत तेजस तराळे यांनी प्रथम तर श्रावणी कुंभार यांनी दुसरा क्रमांक पटकावला. बुकमार्क मेकिंग स्पर्धा झाली. या स्पर्धेत अमिरा शेख, रिफया तेलगी आणि देवकी लवंदे यांनी बक्षिसे जिंकली. त्यानंतर कचरा टू ट्रेझर या स्पर्धेत अमिरा शेख विजेता ठरली. तर संवाद कौशल्याची चाचणी घेणाऱ्या अ टेल ऑफ टू या स्पर्धेत जेसन गोन्साल्वीस आणि गॉर्डन पीरेस यांनी प्रथम क्रमांक पटकावला. निक्षय होबल आणि विठोबा गावकर यांनी दुसरे स्थान पटकावले. कथाकथन स्पर्धेत ग्रिसेल आफोन्सो आणि जोशुआ जॉय यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावले. कॅप्शन द व्हिज्युअल, ग्रीटिंग कार्ड, सेल्फी चॅलेंज स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये अनुक्रमे गॉर्डन पायर्स, अनिस गावस, श्रद्धा परवार, जोशुआ जॉय, अर्चना नायर विजेते ठरले.

गॉडर्न पीरेस आणि अन्विका वायंगणकर यांना अनुक्रमे मिस्टर अँड मिस युफोरिया २०२५ म्हणून घोषित करण्यात आले पदव्युत्तर विभागाचे उपप्राचार्य शरद जमखंडी आणि प्रशासकीय विभागाच्या उपप्राचार्य रोझालिना डिसिल्वा यांच्या उपस्थितीत त्यांचा गौरव करण्यात आला.



# बांदा येथे रंगपंचमीचा उत्साह

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. २८** : होळी पौर्णिमेपासून पंधरा दिवसांनी बांद्याचा रंगपंचमी उत्सव साजरा होतो. त्यामुळे गुरुवारी सकाळपासून दिवसभर बांदयात सर्वत्र रंगाची उधळण सुरू होती. बुधवारी सायंकाळी पारंपारिक सुवारीचा रोंबाट ही फेरी झाली. रात्री स्थानिक कलाकारांचा एकदा पहावं करून हा नाट्य प्रयोग झाला .गुरुवारी सकाळी बांदा बाजारपेठेतील श्री देव मांडकरी देवस्थान येथे पारंपारिक धार्मिक विधी झाल्यानंतर शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत रंगांची उधळण झाली व रंगपंचमीला आरंभ झाला. त्यानंतर दिवसभर संपूर्ण गावात जागोजागी रंगांची उधळण सुरू होती.

ढोल, ताशे ,झांज या पारंपारिक वाद्यांसह डीजेच्या तालावरही नाचण्याचा आनंद जिथे तिथे घेतला जात होता. सायंकाळच्या सत्रात वाजत गाजत रोंबाट फेरी त्यानंतर होळीचा खुंट येथे प्रतिवार्षिक धार्मिक विधी आधी कार्यक्रम होते. गावात सर्वत्र लोकांनी या रंगपंचमी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला.

# सर्वण अपघातात बसथांबा उद्ध्वस्त

■ टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली, दि. २८** : डिचोली ते साखळी या मार्गावरील सर्वण बसस्टॉपजवळ झालेल्या एका विचित्र अपघातात एक ट्रक थेट सर्वण बसथांब्यामध्ये घुसल्याने बसथांबा पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. त्याच्या बाजूलाच असलेल्या एक भेलपुरीचा हातगाडाही पूर्णपणे चक्काचूर झाला. सुदैवानेच मंगळवारी जोरदार पाऊस पडल्याने भेलपुरी गाडा उघडला नव्हता, त्यामुळे जीवितहानी टळली.

उपलब्ध माहितीनुसार मंगळवारी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास सदर अपघात घडला. दोन वाळूने भरलेले ट्रक डिचोलीहून साखळीच्या दिशेने जात असताना एका ट्रकने दुसऱ्या ट्रकला सर्वण बसस्टॉपजवळच ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात रस्त्यावरील रंबलर्सवर सदर ट्रकचा ताबा सुटल्याने तो ट्रक भेलपुरी गाड्याला उडवत थेट सर्व बसथांब्यामध्ये घुसला. त्यामुळे भेळपुरीचा गाडा पूर्णपणे चक्काचूर झालाच तर सर्वण बसस्टॉपच्या सर्व भिंती जमीनदोस्त होऊन वरील पत्र्याची शेड मागच्या बाजूला खाली पडली.

हा अपघात एवढा जबरदस्त होता. याचवेळी साखळी होऊन डिचोलीच्या दिशेने येणाऱ्या एक दुचाकीचालक सदर ट्रकला हलकासा धडकल्याने रस्त्यावर फेकला गेला व सुदैवाने बचावला. उपलब्ध माहितीनुसार ट्रकच्या चालकाने मद्यपान केले होते, अशी माहिती समोर आली आहे.


**NOTICE UNDER ORDER 5 RULE 20(1A) C.P.C by Publication**
**CJSD/PON/EXA 10.2024/A/2025/ 1689**
**IN THE COURT OF SENIOR CIVIL JUDGE, 'A' COURT, AT PONDA**
**Execution Application No, 10/2024/A**

Dr. Uday Laxman Singbal & Ors. ... Decree Holder
V/s
Pushpa Yeshwant Pai Raikar & Ors. ... Judgment Debtor

**SHOW CAUSE NOTICE**

To,
**Judgment Debtors:**
**2.** Ashita Yeshwant Pai Raikar, D/o late Yeashwant Laximan Pai Raikar, Both residents of H. No. 1060, Nageshi, Bandora, Ponda, Goa.
**3.** Atish Yeshwant Pai Raikar, S/o late Yeashwant Laximan Pai Raikar, Married to,
**4.** Samita Atish Pai Raikar, W/o Mr. Atish Yeshwant Pai Raikar, Both Residents of Kunkaikar Nagar, Panaji, Goa

WHEREAS, the above named Decree Holder has filed an application for Execution of Decree dated 31/08/2017 in Special Civil Suit No. 13/2006/A under Order 5 Rule 17 of CPC, 1908. (Copies of the application may be collected from this Court on working days during office hours).
AND WHEREAS notice issued to you at the last available address have been returned unserved to this Court.
AND WHEREAS, in the above said matter, the Advocate for the Decree Holder has filed an application under Order 5 Rule 17 of CPC, 1908.
AND WHEREAS upon perusing the said application, this Court has passed an Order to issue notice to you by way of publication in a local daily newspaper published and circulated in Goa and whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service to publish in local daily Newspaper.
AND WHEREAS, notice is hereby given to you to appear before this Court either in person or by a pleader duly instructed if any, on the **29th day of the month of April of the year 2025 at 10.00 a.m.** to file your reply, on the above said Execution Application.
TAKE further notice that in default of your appearance on the day and time mentioned, the said application will be heard and determined in your absence.
GIVEN under my hand and the seal of the Court on this 27th day of March, 2025.

Seal
**Sd/- ( Jude Torex Sequeira )**
**Ad-doc Civil Judge Senior Division**
**'A' Court, Ponda — Goa.**



**IN THE COURT OF THE INSPECTOR OF SURVEY AND LAND RECORDS, PONDA GOA**
**Case No. ISLR/DEM/PON/TALA/01/2025**

Savita Vithal Sawant
R/o H.no. 243, Holibhat Bhedxem,
Talaulim Ponda Goa
Represented through her POA
Shri Prakash Anant Sawant ...**Applicant**
V/S
1)Pandurang Fondu Naik, R/o Near Mahalaxmi Temple, Holibhat Talaulim, Ponda 2) Narahari Bhaskar Surya Sukhtankar R/o H.no.102, Bhatwada, Sadabhat, Talaulim, Ponda 3)Communidade R/o Talaulim 4)Administrative of Communidade Alto Porvorim, Panaji 5) Venkatesh Mahadeo Sawant R/o Ponda Goa 6) Krishnanath Baburay Naik R/o C/o Vivek K Naik Dwarka Building near Cine Lata Theatre Margao-Goa.7) Vidhya Sandesh Bhingi, Sandesh Balkrishna bhingi, Mr. Sandesh Balkrishna Bhingi, Both R/o Kamarbhat, Talaulim, Ponda ....... **Respondents**

**PUBLIC NOTICE**

Whereas, the above named applicant has moved an application before this authority under section 114 of Goa Land Revenue Code, 1968 to carry out the demarcation of the acquired property surveyed under Survey No. 9/1 of Village Talaulim of Ponda Taluka.
AND WHEREAS, applicant has served the notices through Registered Post to the adjoining holders.
AND WHEREAS, the applicant has made an application on 20/03/2025 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule (20(1-A) of Civil Procedure Code, 1908. AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such permission.
NOW THEREFORE, notice is hereby given to all the above Respondents intimating that date of survey in the aforesaid demarcation case has been fixed **on 02nd April 2025 at 10.30 a.m** onwards at the site.
And whereas, the date of hearing before this authority is posted on **25/04/2025 @ 10.30 a. m.** for the parties to file their say in the matter if any, failing which the case will be heard and decided in your absence.
Given under my hand seal of this Court on this **27th day of March, 2025.**

Sd/- **(Rajesh R. Pai Kuchelkar)**
Inspector of Survey & Land Records,
SEAL Ponda-Goa



**VILLAGE PANCHAYAT UGUEM SANGUEM GOA**
Ref: VP/U/SAN/2024-25/ 2164
Date: - 28/03/2025

**ORDINARY GRAM SABHA MEETING NOTICE**

All the Gram Sabha members are hereby informed that the Ordinary Gram Sabha meeting of V.P. Uguem is called on **06/04/2025 at 9.30 a.m.** in the V.P. Uguem hall to transact the following business on the Agenda:-
All are requested to be present at above Place date & time.

**AGENDA**
**1.** To read and confirm the proceedings of the previous Gram Sabha.
**2.** To Discuss and approve Budget for the Financial Year 2025-26.
**3.** To Discuss and approve Annual Development Plan 2024-25.
**4.** To place & discuss the correspondence received from Public.
**5.** To place & discuss the correspondence received from any Government Department.

Seal
Sd/- ( Sarpanch )
V. P. Uguem, Sanguem Goa

N. B. i) In case there is no Quorum, as required under section 5(6) of the Goa Panchayat Raj, Act: 1994, the same shall stand adjourned for half an hour after fifteen minutes from the appointed time, the meeting shall be held soon thereafter to transact the business on the agenda of the meeting irrespective of the quorum.
ii) If any member of the Gram Sabha desires to submit his / her proposal for the consideration of the Gram Sabha he / she may do in writing, so as to reach the undersigned Four days before the date of the Gram Sabha.


# आंबिये महाविद्यालयात बीबीए अभ्यासक्रमाला प्रारंभ

▸ **राज्यातील पहिलेच सरकारी महाविद्यालय; उच्च शिक्षणात निर्माण केला नवा आदर्श**

■ टीम दैनिक हेराल्ड

**विर्नोडा, दि. २८** : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथे बीबीए (बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन) अभ्यासक्रमाला २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रारंभ झाला असून गोवा सरकारचा हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे. राज्यात या अभ्यासक्रमाला प्रचंड मागणी असून अूनुदानीत स्वरूपाचा बीबीए अभ्यासक्रम सुरू करणारे संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य महाविद्यालय हे राज्यातील पहिलेच सरकारी महाविद्यालय ठरले आहे. गोवा विद्यापीठाची मान्यता व उच्च शिक्षण संचालनालयाच्या पाठिंब्याने सुरू होणारा हा अभ्यासक्रम सर्व शैक्षणिक मानकांचे पालन करतो, त्यामुळे विद्यार्थी सहजपणे स्पर्धात्मक बाजारपेठेचे आव्हान पेलण्यासाठी सुसज्ज बनू शकतात. बीबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज उपलब्ध असतील. कोणत्याही शाखेच्या १२ वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्याला बीबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळणार असून वेगवेगळ्या कंपन्या आणि इंडस्ट्रीमध्ये जवळपास ८ ते १० वर्ष अनुभव असलेले तज्ज्ञ आणि पात्रता असलेले गुणवान शिक्षक हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी नियुक्त केले जातील.

### राज्यातील पहिला अनुदानित अभ्यासक्रम..

**राज्यातील पहिला अनुदानित व्यवसायिक अभ्यासक्रम राज्यात इतर महाविद्यालयांत बीबीए हा कोर्स सेल्फायनान्स तत्त्वावर चालतो. त्याची सर्वसाधारणपणे फी ६० ते ७० हजार रुपये असते. परंतु आंबिये महाविद्यालयात सुरू होणारा बीबीए अभ्यासक्रम हा अनुदानित स्वरूपाचा असून त्याची फी १० हजार रुपयेच्या आसपास आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांनाही अत्यंत माफक फी देऊन हा अभ्यासक्रम शिकता येणार आहे, हा या अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा विशेष आहे.**

### अनुभवात्मक शिक्षणाला प्राधान्य

**बीबीए अभ्यासक्रम अनुभवात्मक शिक्षणाला प्राधान्य देतो. ज्यामध्ये उद्योग भेटी, केस स्टडी आणि व्यावहारिक प्रकल्पांचा समावेश आहे. ज्यातून विद्यार्थ्यांची कौशल्ये वाढवली जातील आणि यशस्वी होण्यासाठी सक्षम बनविले जाईल. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय मानसिकता विकसित करणे आणि भविष्यात नोकरी देणारे उद्योजक म्हणून त्यांची जडणघडण करून राज्याच्या आर्थिक वाढीला हातभार लावणे हे बीबीए अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**

### वर्गाबाहेरील शिक्षणाला प्राधान्य

**बीबीए कोर्स अंतर्गत केवळ विद्यार्थ्यांना वर्गातच शिकविले जाणार नसून इंडस्ट्रीमध्ये काम करण्याचा अनुभवही या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने दिला जाईल. त्यामुळे बीबीए कोर्स अंतर्गत जसे वर्गातील शिक्षणाला महत्त्व तसेच वर्गाच्या बाहेरील शिक्षणालादेखील महत्त्व दिले जाणार आहे.**

## पान १ वरून

### मडगावमध्ये करवाढीविरोधात आंदोलन

रुपयांची चोरी, नोकरी घोटाळा आणि अलीकडील १८ लाख रुपयांच्या लुटीचा उल्लेख केला. नगरसेवक रवींद्र नाईक आणि लिंडन परेरा यांनी भाडेवाढीला ठाम विरोध दर्शवला, तर कॅमिलो बॅरेटो यांनी भाडेवाढ अन्याय्य असल्याचे सांगत सामान्य नागरिकांवर त्याचा मोठा परिणाम होईल, असे स्पष्ट केले. सावियो कुतिन्हो यांनी निषेधाचा शेवट करत परिषदेने जनतेच्या भावना दुर्लक्षित केल्यास नागरिकांना सविनय कायदेभंग आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा दिला. तसेच, करदात्यांनी कर भरणे थांबवावे, अशी सूचनाही त्यांनी दिली.

------------

### आंतरराष्ट्रीय सायबर गुन्ह्याचा पर्दाफाश; तिघांना अटक

की हे सिंडिकेट मुंबईतील एका अनधिकृत एजन्सीद्वारे चालवले जात होते. ही एजन्सी परराष्ट्र मंत्रालयाच्या मंजुरीशिवाय भारतीय नागरिकांची परदेशात बेकायदेशीर भरती करत होती. त्यांनी थायलंड आणि कंबोडियामध्ये दरमहा ६0 हजार ते ७0 हजार रुपयांच्या पगारावर नोकरीच्या संधी असल्याचे सांगून तरुणांची भरती केली. मात्र, प्रत्यक्षात त्यांचे पासपोर्ट्स जप्त करण्यात आले आणि त्यांना जबरदस्तीने सायबर गुलामगिरी कॉल सेंटर्समध्ये काम करायला लावले गेले,असे कुमार यांनी स्पष्ट केले.

नुलाक्सी व्यतिरिक्त, पोलिसांनी तामिळनाडूतील आदित्य रविचंद्रन (२२) आणि महाराष्ट्रातील रूपनारायण गुप्ता (३६) यांना अटक केली आहे. गुप्ता हा एक बेकायदेशीर भरती एजंट असून, त्याने १00 हून अधिक लोकांची थायलंड आणि कंबोडियामध्ये तस्करी केल्याचा संशय आहे. तो ऑनलाईन मुलाखती घेत असे आणि त्यामध्ये थायलंड किंवा फिलिपिन्समधील नागरिकांचाही सहभाग घेत असे, जेणेकरून उमेदवारांचे भाषाशैली कौशल्य तपासले जाऊ शकते, असे गुप्ता यांनी सांगितले.

तपासादरम्यान सिंडिकेटच्या आंतरराष्ट्रीय विस्ताराच्या योजनांचाही उलगडा झाला. हे नेटवर्क भारत, नेपाळ आणि बांगलादेशमध्येही सायबर फसवणुकीची केंद्रे स्थापन करण्याच्या तयारीत होते, असे कुमार यांनी सांगितले. तसेच, बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांसाठी वापरण्यात येणारी बँक खाती आणि सिमकार्ड भाड्याने देण्याच्या व्यवसायातही हे गट सामील असल्याचे पोलिसांनी उघड केले.

पोलिस महासंचालक आलोक कुमार व सायबर सुरक्षा विभागाचे पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता यांनी संयुक्तपणे घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की, अटक केलेल्या आलेल्या संशयितांकडून नवनवीन माहिती मिळत आहे. या घोटाळ्याचे काही धागेदोरे गोव्यात आहेत का? तसेच संशयितांनी गोव्यातील काही ठकसेनांची घोटाळ्यासाठी मदत घेतली आहे का? या दृष्टिकोनातूनही तपास सुरू आहे. बँक खाते व सीम कार्ड भाड्याने घेऊन नोकरीच्या आमिषाने फसवणूक करणारे हे एक आंतरराष्ट्रीय रॅकेट आहे. तपासानंतर किती लोकांची फसवणूक झाली आहे? किती जण या रॅकेटमध्ये आहेत, त्याचा लवकरच उलगडा होईल. या संपूर्ण कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर सायबर गुलामगिरीच्या नेटवर्कबाबत महत्त्वपूर्ण धागेदोरे समोर आले असून, पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

-------------

### म्यानमारमध्ये भूकंप : हजारो मृत्यूमुखी!

व्हिडिओमध्ये इमारतीच्या जलतरण तलावातील पाण्यात उंच लाटा उसळताना दिसल्या. सरकारकडून परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आपत्कालीन बैठक घेण्यात आली आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमार आणि थायलंडमधील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी ' एक्स ' वरील पोस्ट मध्ये म्हटले आहे की, भूकंपानंतरच्या परिस्थितीमुळे आम्ही चिंतीत आहोत. प्रत्येकाच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करतो. भारत शक्य ती सर्व मदत करण्यास तयार आहे आणि आम्ही अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाला म्यानमार आणि थायलंड सरकारशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे.

यूएस जिओलॉजिकल सर्व्हेच्या अहवालानुसार, १९३० ते १९५६ या काळात सागिंग फॉल्टजवळ ७.0 रिश्टर स्केलच्या सहा भूकंपांची नोंद झाली होती. म्यानमारचा हा भाग भूकंपप्रवण क्षेत्रात येतो, त्यामुळे भविष्यातही अशा धक्क्यांची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, थायलंड हा भूकंपप्रवण देश नाही. मात्र, म्यानमारच्या सीमेवर झालेल्या भूकंपांचा परिणाम येथे जाणवत असतो. विशेषतः बँकॉकमधील इमारती भूकंपरोधक नसल्यामुळे येथील नुकसान अधिक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. भूकंपानंतर बचाव आणि मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी यंत्रणा कार्यरत असून आंतरराष्ट्रीय मदतीसाठी आवाहन करण्यात आले आहे. चीन, अमेरिका आणि भारत यांसारख्या देशांनी मदतीसाठी तत्पर असल्याचे स्पष्ट केले आहे. भूकंपाचे आफ्टरशॉक्स अजूनही जाणवत असल्याने नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. म्यानमार आणि थायलंडमध्ये परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी स्थानिक प्रशासन अथक प्रयत्न करत आहे.

# मांद्रे नववर्ष स्वागताची जय्यत तयारी

## सहभागी होण्याचे स्वागताध्यक्ष कायसुकर यांचे आवाहन, ३० रोजी होणार प्रभात फेरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २८** : गुढीपाडव्याच्या दिनी हिंदू नववर्ष साजरे केले जाते. कित्येकदा या उत्सवाचे विस्मरण होऊ लागल्याने बाल, युवा पिढीला याची समग्र माहिती व्हावी, या हेतूने गुढी संस्काराची, गुढी संस्कृतीची या ब्रीदनुसार सोहळा करण्याचे योजिले आहे. मांद्रे तसेच अन्य गावातील नागरिक स्त्री पुरुष, युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष मुकुंद कायसुकर यांनी केले.

मांद्रे जिल्हा पंचायत सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. यंदाचा उत्सव श्री सप्तेश्वर मंदिर प्रांगणात होणार आहे. या उत्सवाबाबत अनेकांना याबाबत उत्सुकता आहे. यावर्षी महिला समिती गठीत केली असून, त्यांच्यातील चैतन्य वाढत आहे. गावातील प्रत्येक वाड्यावर तसेच घराघरांत संपर्क चालू असून निमंत्रण पत्रिका वाटप सुरू असून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आपला गुढीपाडवा सण, उत्सव सार्वजनिक साजरा करण्यासाठी एकदिलाने सहभागी व्हावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष मुकुंद कायसुकर यांनी केले आहे.

या गावात २०१९ पासून नववर्ष सार्वजनिक साजरे केले जाते. उत्सवासाठी हिंदू संघटित होणे गरज ओळखून, यंदाचे नववर्ष गुढी पाडवा उत्सव मतभेद विसरून सर्वांनी साजरा करावे व संपूर्ण गोव्यात एक आदर्श पायंडा निर्माण करण्याचे आवाहन हिंदू चळवळीतील कार्यकर्ते विनायक च्यारी यांनी केले.

हिंदू नववर्ष साजरा करण्यासाठी दोन महिन्यापूर्वी बैठका सुरू केल्या व संपूर्ण मांद्रे गावातील नागरिकांना सामावून घेण्याचा निर्णय पक्का झाला. यासाठी देवस्थान समिती, विविध सांस्कृतिक व क्रीडा संस्था आदींच्या सहकार्याने व पाठिंब्याने गुढीपाडवा साजरा करण्याचे नियोजन केले आहे, असे महेश गोडकर यांनी सांगितले. यंदाच्या उत्सवात विद्यार्थी व युवती युवकांनी सहभागी होऊन संस्कृतीची परंपरा पुढे नेण्यासाठी सहभागी व्हावे, असे संपर्क प्रमुख ॲड. प्रसाद शहापूरकर यांनी व्यक्त केले.

गुढी ही शौर्याची व यशकीर्तीची प्रतीक आहे.अशा उत्सवास आई वडिलांनी आपल्या मुलांना घेऊन यावे व नववर्षगुढीची माहिती द्यावी, असे आवाहन वीणा म्हामल यांनी केले.

यंदाच्या गुढीस ओवाळणी करण्यासाठी महिलांनी नऊवारी साडी नेसून व पंचारती घेऊन येण्याची गरज आहे. ग्रामदेवी श्री भगवती चरणी येऊन गुढी पूजन व देवीचे आशीर्वाद घेण्यासाठी महिलांनी जरीकाठ असलेली वस्त्रे नेसून यावीत व कुटुंबातील सर्वांना घेऊन यावे, असे आवाहन नेत्रा मांद्रेकर यांनी केले.

भगवती सप्तेश्वर देवस्थान प्रांगणात ३० रोजी सकाळी ६ वाजता नववर्षी उत्सव सुरू होईल. ६.३६ मिनिटांनी सार्वजनिक गुढी पूजन, मार्गदर्शन, प्रसाद वितरण होईल. त्यानंतर प्रभात फेरी सुरू होईल. श्री सप्तेश्वर मंदिर, आश्वे, जुनसवाडा, मधलामाज, मराठवाडा, गावडेवाडा, सावंतवाडा, साळगावकर, नाईकवाडा, आस्कावाडा व मंदिर अशी प्रदक्षिणा व सांगता होईल, असे उपाध्यक्ष तन्वी केरकर यांनी सांगितले. यावेळी सुभाष पार्सेकर, खजिनदार परेश सावंत, रवी गोवेकर, दीपा हडफडकर, रूपा सातोस्कर,राधा कवठाणकर, रिया गोसावी, सुहाना हणजूणकर, सेजल गावडे व नीलम पार्सेकर उपस्थित होते.

# भाऊसाहेबांच्या दूरदृष्टीमुळे बहुजन समाज शिक्षित

▸ **देवेंद्र प्रभुदेसाई : केरी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये बांदोडकर जयंती**

■ टीम दैनिक हेराल्ड



**केरी : न्यू इंग्लिश स्कूलमध्ये भाऊसाहेब बांदोडकर जयंती निमित्त बोलताना निवृत्त शिक्षक देवेंद्र प्रभुदेसाई. सोबत व्रजेश केरकर, शैलेंद्र कुबल, मिलिंद तळकर,भावार्थ मांद्रेकर आल्फ्रेड रॉड्रिग्ज व इतर.**

**हरमल, दि. २८** : गोव्याचे प्रथम मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर हे गोमंतकाचे भाग्यविधाते आहेत.त्यावेळी गोवा मुक्त झाला व बहुजन समाज खूपच वंचित होता. त्या समाजाचा उध्दार करण्यासाठी प्रत्येक गावात तसेच वाड्यावाड्यावर प्राथमिक शाळा सुरू केल्या. त्यामुळेच बहुजन व कष्टकरी समाज शिक्षित झाला व प्रगतिशील बनला, असे प्रतिपादन निवृत्त शिक्षक देवेंद्र प्रभुदेसाई यांनी केले.

केरी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये भाऊसाहेब बांदोडकर जयंती निमित्त तसेच नवोनमेष वार्षिक अंकाचे प्रकाशन व विध्यार्थी दिवस सोहळ्यात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष व्रजेश केरकर,व्यवस्थापक शैलेंद्र कुबल,खजिनदार मिलिंद तळकर, बाबूसो तळकर,प्राथमिक पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रज्योती वस्त,उपाध्यक्ष पूजा सावळ,हायस्कूलच्या पालक शिक्षक संघाचे संजना तळकर,सदस्य मेधा नाईक,अक्षदा बाबरेकर,अंकिता न्हानजी,मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर,कार्यक्रम संयोजक शिक्षक आल्फ्रेड रॉड्रिग्ज उपस्थित होते.प्रारंभी दीपप्रज्वलन व भाऊसाहेब बांदोडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.चेअरमन व्रजेश केरकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व भाग्यविधाते भाऊसाहेब बांदोडकर याना अभिवादन केले.

पोर्तुगीजांच्या तावडीतून मुक्त झाल्यानंतर राज्यात संस्कृती व शिक्षण महत्वाचे मानून भाऊसाहेबांनी कार्य सुरू केले,त्यांच्या ह्या कृतीचा जबरदस्त परिणाम झाला. राज्याची संस्कृती उत्सव टिकून राहिले व कालांतराने लोक शिक्षित झाले. विद्यार्थ्यांनी भविष्य घडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे,असे देवेंद्र प्रभुदेसाई यांनी व्यक्त केले.

यावेळी विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण केले. त्याचे निवेदन क्षमा गडेकर व शर्मिला नाईक यांनी केले. शिक्षिका नीलम म्हालदार यांनी सूत्रनिवेदन तर सोनाली वस्त यांनी आभार मानले.